# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)




16 March 2020 Special Issue- 24 Vol. 1

# CONTRIBUTION OF TOURISM IN NATIONAL DEVELOPMENT ( CTND2020 )

Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editor
Vice Principal Dr. U.S. Sawant

Co- Editor's
Dr. S.S. Shinde
Dr. S.M.Bindge

37. भारतीय पर्यटन क्षेत्राचा विकास व त्यापुढील आव्हाने 97
प्रा.देविदास रिठे

38. महाराष्ट्रातील कृषी पर्यटन एक अभ्यास 100
आढाव संध्या शिवहार

39. ऐतिहासिक वारसा व पर्यटन 104
प्रा. शिवाजी सुभाष खिराडे

40. महाराष्ट्रातील पर्यटन आणि रोजगार संधी 108
प्रा.सिसोदीया प्रदीप बन्सीधर

41. "उस्मानाबाद जिल्ह्यातील शिवमंदिरे एक ऐतिहासिक वारसा" 111
सुर्यवंशी सुनिल सुधाकरराव,

42. उदगीर शहराचे ऐतिहासिक महत्व – एक अभ्यास 113
डॉ. ओमप्रकाश क्षीरसागर , प्रा.डॉ.शिंदे अनंत नामदेवराव

43. ऐतिहासिक वारसा आणि पर्यटन (Historical Heritage and Tourism) 116
डॉ.शिवाजी सोमला पवार

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 24 , Vol. 1
March 2020

Peer Reviewed
SJIF

ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# भारतीय पर्यटन क्षेत्राचा विकास व त्यापुढील आव्हाने

**प्रा.देविदास रिठे**
इतिहास विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

---

**प्रस्ताविक :-**

पर्यटनाचा अर्थ स्वदेशी व विदेशी स्थळाची यात्रा करणे होय. ज्यामध्ये सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक, क्रिडा, अधिवेशने इ. स्थळांच्या यात्रेचा समावेश होतो.

पर्यटन खऱ्या अर्थाने एक मौलिक व ऐच्छिक क्रिया आहे, पर्यटन एक उद्योग आहे ज्याच्या अंतर्गत पर्यटकांच्या आगमनापासून त्यांना प्रेक्षणिय स्थळांकडे आकर्षित करणे, त्या स्थळापर्यंत पोहचविणे, त्यांच्या राहण्याची, जेवणाची व मनोरंजनाची व्यवस्था करणे आणि परत घरापर्यंत त्यांना पोहचण्याशी संबंधित आहे. आज संपूर्ण जगात पर्यटन उद्योगाला महत्व प्राप्त झाले आहे. काही देशांच्या अर्थव्यवस्था तर पर्यटन उद्योगावरच अवलंबून आहेत. पर्यटन उद्योगाच्या दृष्टिने भारत एक महत्वाचे राष्ट्र आहे. भारताला लाभलेला हिमालय, समुद्र किनारा, सांस्कृतिक विविधता, धार्मिक स्थळे यामुळे जगातील अनेक देशातील पर्यटक भारताकडे आकर्षित होतात. त्या दृष्टिने भारताच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाला महत्व प्राप्त झालेले आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टये:-**

- भारतीय पर्यटनाचा इतिहास जाणुन घेणे.
- भारतीय पर्यटन विकासाचा आढावा घेणे.
- पर्यटन व्यवसायातील नवनवीन बदलाचा अभ्यास करणे.
- पर्यटन उद्योगामुळे अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**

सदरील शोध निबंधाच्या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यात पर्यटन मंत्रालयाचा रिपोर्ट, वर्ल्ड ट्रॅव्हल्स ॲन्ड टुरिझमचा रिपोर्ट व इतर संदर्भ ग्रंथाचा आढावा घेतला गेला.

**भारतातील पर्यटन :-**

कृषीप्रधान व प्राकृतिक सौंदर्यसृष्टीने व त्याच प्रमाणे विविधतेने नटलेला भारत देश मोठ्या प्रमाणात विस्तारलेला आहे. विविध क्षेत्रातील विविधता यामुळे जगातील अनेक पर्यटकांना काही ना काही देण्याची क्षमता या देशात आहे. या ठिकाणी प्राचीन, ऐतिहासिक वास्तुंचे सौंदर्य येथील शास्त्रोक्त लोक संगीत, लोककला, नृत्य यांची प्रदीर्घ परंपरा आहे. भारतातील शेकडो धार्मिक पवित्र स्थळे जगभरातील पर्यटकांना साद घालतात म्हणुनच भारताला पर्यटकांचे नंदनवन असे म्हणतात.

ऑगस्ट २०१९ पर्यंत भारतात ३८ जागतिक वारसा स्थळे आहेत. ज्यांना युनोस्कोची मान्यता प्राप्त आहे. आधुनिक पर्यटन विकासाचे आर्थिक लाभ पाश्चात्य विकसित देशांनी यापुर्वीच उचललेले असले तरी आपल्या देशात मात्र विसाव्या शतकाच्या सहाव्या दशकात या व्यवसायाला सुरुवात झाली. नंतरच्या काळात या व्यवसायाच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले. या देशाच्या इतिहासात इतिहास व पर्यटन हे दोन वेगवेगळे भाग नसून या देशाची उच्च सांस्कृतिक परंपरा येथील इतिहासाशी संबंधित आहे. येथील प्राचीन ऐतिहासिक आकर्षक अवशेष पर्यटनाचे लक्ष वेधून घेतात. याशिवाय भारताला आकर्षक भौगोलिक स्थान लाभलेले आहे. विविध प्रकारचे हवामान, प्राणी, पक्षी, जंगले, खनिजे, नद्या, धबधबे, पर्वत, शिखरे, समुद्र किनारे यांनी या देशाचे प्राकृतिक दालन समृध्द केलेले आहे.

**भारतातील पर्यटनाचा विकास :-**

पर्यटन व्यवसायाचा विस्तार व विकास करण्यासाठी पर्यटन नियोजन अत्यावश्यक असते. उपलब्ध नैसर्गिक साधनांचा पर्याप्त वापर करणे म्हणजे नियोजन होय. पर्यटन हा जगात महत्वाचा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. पर्यटन व्यवसायाला आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय महत्व ही प्राप्त झालेले आहे.

पर्यटन व्यवसायातुन रोजगार उपलब्धता बाजारपेठेचा विकास, देशाला महसूल व परदेशी चलन प्राप्त होते. भारतामध्ये नैसर्गिक वास्तुकला विषयक व ऐतिहासिक साधन संपत्तीचे इतके वैपुल्य व विविधता आहे की त्या विदेशी पर्यटकाला आकृष्ट करुन घेतील अशा कला निटपणे व सुबकपणे पाडण्याच्या व पुढे अधिकाधिक विकसित करण्याच्या कलेवर भर देणे महत्वाचे ठरेल.

भारत जगातील पाच पर्यटक स्थळापैकी एक आहे यामुळे भारतीय पर्यटन विभागाने सप्टेंबर २००२ मध्ये 'अतुल्य भारत' नावाने एक अभियान सुरु केले. त्याचा सुरुवातीचा तीन महिन्याचा खर्च भारत सरकार आणि एक्सपीरीयन्स इंडिया सोसायटीने उचलला. ही संस्था ट्रॅव्हल्स एजन्टशी जुळलेली आहे. या अभियाना अंतर्गत हीमालय, वन्यजीव योग व आयुर्वेद कडे आंतरराष्ट्रीय समुहाचे लक्ष खेचल्या गेले. देशाच्या पर्यटन क्षेत्रासाठी या अभियानाने विकासाची नवी दारे उघडल्या गेली. देशाची पर्यटन क्षमता जगासमोर प्रस्तुत करणारा हा पहिला प्रयोग होता. पर्यटन क्षेत्राचा विकास पहिले राज्य सरकारच्या अधिन होता तेव्हा पर्यटनासंबंधी राज्या-राज्यामध्ये समन्वयाचा अभाव होता.

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 24 , Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

अतुल्य भारत या अभिनयाद्वारे देशाची दारे विदेशी पर्यटकासाठी उघडण्यासाठी योग्य प्रकारे प्रयत्न केल्या गेले. विमानतळे पर्यटन स्थळाशी जोडल्या गेली त्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली. त्यामुळे आज विदेशी पर्यटकांना दुरच्या पर्यटन स्थळांना भेटी देणे सोपे झाले आहे. खाजगी विमान कंपन्यांना देशात विमानसेवा सुरु करण्याची परवानगी दिल्यामुळे ही विकासाला चालना मिळाली. मार्च २००६ मध्ये एशिया प्रशांत द्वारा जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारत आंतरराष्ट्रीय पर्यटनामध्ये सर्वात वेगाने वाढणाऱ्या बाजारपेठेच्या रुपाने समोर आला आहे. २००५ मध्ये पर्यटन क्षेत्रामध्ये भारताचा कारभार ३७२ बिलीयनचा झाला. भारतीय पर्यटन विभागासाठी व पर्यटन मंत्रालयासाठी ही अत्यंत आनंदाची बातमी होती. अतुल्य भारत ब्रॉड लाईनच्या सुरुवातीमुळे २०१० मध्ये विदेशी पर्यटकाचे आगमन २.३८ मिलेनियमने वाढुन ५.५८ मिलीयन झाले. वर्ल्ड ट्रॅव्हल्स अॅन्ड टुरिझम काऊंसिल (WTTC) २०१८ च्या रिपोर्ट नुसार भारताला पर्यटनामध्ये तिसरे स्थान मिळाले आहे. या रिपोर्ट मध्ये १८५ देशाचा मागील सात वर्षाच्या प्रदर्शनाचे (२०११-२०१७) अवलोकन करण्यात आले होते.

२०१७ मध्ये पर्यटन उद्योगातुन भारताला २३ अरब डॉलरचे उत्पन्न मिळाले होते जे २०२३ पर्यंत १०० अरब करण्याचे ठरल्या गेले. जे की फ्रान्स व चीनच्या तुलनेत जास्त आहे. २०१७ मध्ये भारतात १.४ करोड विदेशी पर्यटक आले होते. तर २०१४ मध्ये हाच आकडा ७६.८ लाख इतका होता. यादृष्टीने भारताने पर्यटनाच्या क्षेत्रात प्रतिवर्ष १४ टक्के वाढ केली जे की जागतिक टक्केवारी ६.८ व आशियाई टक्केवारी ५.७ च्या अधिक आहे. परंतु देशांतर्गत वृध्दी केवळ २.३ टक्के एवढीच होती. विश्व आर्थिक मंच नुसार पर्यटनाच्या क्षेत्रात प्रतिस्पर्धात्मक सुचकांकमध्ये मागील चार वर्षात भारताने २५ व्या स्थानावर झेप घेतली. याचे श्रेय सरकारच्या प्रयत्नांना जाते.

**सरकाचे प्रयत्न :-**

भारतातील विशाल भौगोलिक संरचना व समृध्द ऐतिहासिक वारसा यामुळे इथे पर्यटन क्षेत्राच्या विकासाची मोठी संधी आहे. या कारणानेच भारत सरकाने या क्षेत्रात सुधारणा करण्याचा अनेक योजना लागू केल्या.

- देशात पर्यटन विकासाच्या दृष्टीने 'स्वदेश दर्शन योजना' प्राचीन ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी 'हृदय योजना' धार्मिक पर्यटनाच्या विकासासाठी 'प्रसाद योजना' लागु केल्या.
- विदेशी पर्यटकांना भारतात येणे सोपे व्हावे यासाठी १६६ देशासाठी इ. व्हिजा (ईलेक्ट्रॉनिक व्हिजा) ची व्यवस्था केली.
- पर्यटन मंत्रालय विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पुर्वोत्तरकडील पर्यटन स्थळांचा विकास करत आहे.
- भारत सरकारने २२-२४ नोव्हेंबर २०१८ मध्ये त्रिपुरा मधील आगरतळा येथे आंतरराष्ट्रीय पर्यटन समारंभाचे आयोजन केले त्याद्वारे उत्तरपुर्वी राज्यामध्ये पर्यटनाला प्रोत्साहन देणे हा हेतु होता.
- विदेशात भारतीय सांस्कृतिक वारसांना लोकप्रिय बनविण्यासाठी द हेरीटेज ट्रेल, भारतीयांना आपल्या देशाप्रती जागरु करण्यासाठी 'देखो अपना देश' या नावाने पर्यटन पर्वाचे आयोजन केले. तसेच अनेक राज्यांच्या विशेष स्थळा ठिकाणी 'पर्यट सभी के लिए' आयोजन केले.
- सध्या भारत सरकारने अतुल्य भारत पर्यटक सुविधा प्रमाणपत्र पोर्टल लॉंच केले आहे. त्याद्वारे देशाचे नागरीक वेगाने विकसि होणाऱ्या पर्यटन उद्योगाचा हीस्सा बनु शकतील.
- याशिवाय भारत सरकारने अतुल्य भारतचे नवीन पोर्टल लॉंच केले तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना अतुल्य भारतचा ब्रॅन्ड अँबेसे ही बनविले.

**अन्य प्रयत्न:-**

सध्याच्या सरकारने आंतरराष्ट्रीय स्तरावर ५० पर्यटन स्थळ विकसित करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. तेथे जागति स्थरावरील सुविधा विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. त्यादृष्टीने लाल किल्ला खाजगी क्षेत्राला लीजवर दिल्या जात आहे.

- २०२० पर्यंत २ करोड विदेशी पर्यटकांचे आगमन लक्षात घेऊन मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार येथील पर्यटन स्थळावर पाया सुविधा वाढविण्यावर भर दिल्या जात आहे.
- रात्रकालीन पर्यटनाला उत्तेजन देण्यासाठी पर्यटन मंत्रालयाने देशभरातील १० ऐतिहासिक स्मारक रात्री ९ वाजेपर्यंत सुरु ठेवण्य निर्णय घेतला.

**रोजगाराच्या संधी :-**

पर्यटन उद्योगामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यटन विषयक विकास होण्या बरोबरच पर्यटन स्थळ परिसरात राहण नागरीकांच्या जीवनातही बदल घडून येतो. पर्यटकाला आवश्यक असणारी निवास, भोजन, वाहतुक, माहिती मनोरंजन, स्थानिक वस्तु, आदीच्या गरजेमुळे या भागातील उत्पादनाला सुध्दा मागणी निर्माण होते. सांस्कृतिक आदान प्रदानाच्या माध्यमातुन नागरीकांना एकमे जोडण्याचे काम देखील पर्यटनाच्या माध्यमातुन निर्माण होत असते. त्यामुळे पर्यटन विकासात नागरीकांचा जेवढा सहभाग वाढेल त्या भागातील अर्थकारणाला देखील गती मिळते.

**पर्यटन क्षेत्रा पुढील आव्हाने :-**

भारत सरकार द्वारा पर्यटकांना प्रदान केल्या जाणाऱ्या सुविधेशिवाय विकसित पर्यटन प्रणाली समोर अनेक आव्हाने आहेत.

- प्रथम पायाभुत सुविधेचा अभाव भारतीय पर्यटन क्षेत्रासमोरील एक मोठे आव्हान आहे. पर्यटनाशी संबंधीत आर्थिक आणि सामाजिक संरचना, हॉटेल, कनेक्टीव्हीटी, मानवसंसाधन, स्वास्थ इ. क्षेत्रामध्ये विकासाचा अभाव आहे. त्याचे मुख्य कारण अपुरे अर्थ सहाय्य होय. इ.स. २०१७-१८ च्या बजेटमध्ये केंद्र सरकारने पर्यटन सारख्या मोठ्या क्षेत्रासाठी १८४० करोड एवढाच निधी मंजुर केला.
- देशाच्या प्रमुख पर्यटन स्थळावर पसरलेली घान, दुर्गंधी ही एक मोठी समस्या आहे. पाश्चात्य देशातील पर्यटक फक्त यामुळेच भारतात येणे पसंद करत नाहीत. कारण भारतात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे.
- पर्यटकांची सुरक्षा विशेषता विदेशी पर्यटकांची पर्यटन विकासाच्या विकासातील ही प्रमुख अडचण आहे. विदेशी नागरीक विशेषता महिला वरील हल्ले यामुळे भारताच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करतात. उल्लेखनिय आहे की २०१७ मध्ये १३० देशात केलेल्या सर्व्हेक्षणामध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक्स फोरम सुचकांकमध्ये भारताला ११४ व्या स्थानावर ठेवले आहे.
- तसेच भारताला आपल्या समृध्द सांस्कृतिक वारसाचा प्रचार करण्यात तेवढे यश मिळाले नाही जेवढे युरोपियन देशाना मिळाले.
- स्वास्थ पर्यटन, योग, प्राकृतिक चिकित्सा साहसिक पर्यटनास मोठी संधी असुन सुध्दा त्याकडे दूर्लक्ष केल्या जाते.

**निष्कर्ष:-**

पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी सरकारद्वारा केले जाणारे प्रयत्न अभिनंदनिय आहेत. सध्यस्थितीत पर्यटनाशी संबंधीत ज्या समस्या आहेत त्या दूर करण्यासाठी काही उपाय योजले जाऊ शकतात.

- सरकारद्वारा पर्यटनाच्या सर्वांगिन विकासासाठी खाजगी क्षेत्रालाही प्रोत्साहन देण्याची गरज आहे.
- पर्यटकांची सुरक्षा सुनिश्चित करणे गरजेचे आहे. पर्यटन स्थळी कायदा व सुव्यवस्थे संबंधी योग्य बंदोबस्त करणे गरजेचे आहे.
- अतुल्य भारत आणि अतिथिदेवोभवः सारखे स्लोगननांना व्यापक स्वरुपात प्रसारित करणे गरजेचे आहे. याशिवाय माफक दरातील हॉटेलाचे निर्माण व मनोरंजनाचे नवे-नवे प्रकार व विकल्प तयार करणे गरजेचे आहे.
- जास्तीत जास्त पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अॅडव्हेंचर टूरिझमवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे.
- देशात काही राज्य सोडले तर अनेक राज्यांची स्थिती चांगली नाही अशा वेळेस पर्यटनाच्या माध्यमातुन आर्थिक विकासाला गती देण्याऱ्या राज्याकडून इतर राज्यांनी बोध घेतला पाहिजे.
- सर्व राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशांनी पुरातत्व सर्व्हेक्षणाच्या साहाय्याने आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळासाठी प्रस्ताव तयार करतांना युनोस्कोच्या मापदंडानुसार तयार करावा.
- राज्य सरकारांनी आपल्याकडे दरवर्षी वाढणाऱ्या पर्यटकांच्या संख्येवरुन सर्व स्थळांचा विकास करण्यावर भर द्यावा त्यासाठी स्वतः निधी उभारावा.
- महानगरापासून पर्यटन स्थळापर्यंत कनेक्टीव्हीटी, पर्यटकांची संख्या दुप्पट करण्यास व समग्र विकास करण्यात मोठे योगदान देऊ शकते यासाठी त्याचा विस्तार करण्यावर भर द्यावा.

**संदर्भ सुची :-**

- रमेशचंद्र, भारत के ऐतिहासिक एवं पर्यटन स्थल, निळकंठ प्रकाशन, २००६.
- दुबे अभयकुमार (संपा) भारत का भुमंडलीकरण, वाणी प्रकाशन, नवी दिल्ली, २००३.
- अनिल कठारे व अन्य, पुरातत्त्व विद्या वस्तु संग्रहालयशास्त्र आणि पर्यटन, विद्या बुक पब्लिकेशन, २०११.
- यात्रा व पर्यटन प्रतिस्पर्धा सुचकांक २०१७.
- Travel & Tourism Economic Impact, 2018
- Indian travel and Tourism council 22 March 2017